## **—न्यायनिर्णय—**

(आज दिनांक ११.०३.२०२६ रोजी घोषीत)

आरोपी विरुध्द कलम ६५ (ई) महाराष्ट्र दारूबंदी कायदया अंतर्गत दंडनिय अपराधा करीता आरोप ठेवण्यात आले. अभियोगपक्षाने आरोपीविरूध्द आरोप सिध्द होण्याकरीता एकूण ३ साक्षीदारांचा तोंडी पुरावा नोंदविला.

**२.** अभिलेखावर उपलब्ध असलेल्या साहीत्यावरून माझ्यासमक्ष विचाराधिन मुद्दे आणि निष्कर्ष कारणमीमांसासह खालील प्रमाणे आहे :—

| **अ. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले काय की, दिनांक ०८/१२/२०२३ रोजी १८:३५ ते १९:१० वाजताच्या दरम्यान मौजा मुंडीकोटा ता. तिरोडा येथे आरोपीच्या ताब्यातुन १७ लिटर मोहाफुलाची हातभट्टी दारू असे एकूण किमंत रूपये १७००/— विना परवाना अवैधरित्या मिळुन आले ? | **नाही.** |
| २. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

**३.** अभियोग पक्षातर्फे साक्ष नोंदवील्यानंतर आरोपीविरूध्द पुरावा आल्याने त्याचे फौ.प्र.सं. कलम ३१३ प्रमाणे बयाण नोंदविण्यात आले. तसेच सरकारीपक्षाने जप्ती पंचनामा सही पुरता **नि.क्र. ११** वर भिस्त ठेवलेली आहे.

## **कारणमिमांसा**

**मुद्दा क्र. १ व २ करीता :**

**४.** प्रस्तुत प्रकरणात फिर्यादी यांनी साक्ष दिली की त्यानी दिनांक ०८/१२/२०२३ रोजी पंचासमक्ष आरोपीकडून मोहाफुलाची हातभट्टी दारू जप्त केली होती व एका बाटलीमध्ये सॅपल काढले. आरोपीविरूध्द फिर्याद व एफआयआर नि.क्र. १२ व १३ वर नोंदविली. सा.क्र. ३ शिवलाल धावडे तपासी अधिकरी असुन त्यांनी जप्तीपंचनामा नि.क्र. १४ अन्वये बनविला. आरोपीकडून जप्त दारू वेगळी करून सि.ए फॉर्म व मुद्देमाल पावती नि.क्र. १५

व १६ अन्वये बनविला. तपासअंती त्यांनी दोषारोपपत्र दाखल केल्याचे सांगितले. परंतु आरोपीवरील गुन्हा सिद्ध होणेकामी त्याच्याकडून झालेली जप्ती सिद्ध होणे आवश्यक आहे. त्याकरीता अभियोगपक्षाने पंच प्रशांत मुन्नीलाल मेश्राम साक्षदार क्रमांक १ यास तपासले. परंतु त्याने अभियोग पक्षास मदत केली नाही. जप्ती पंचनाम्यावरील सही ओळखली परंतु त्याच्या समक्ष दारू जप्त झाल्याचे व पंचनामा तयार केल्याचे त्याने अमान्य केले. तसेच दुसरा पचं साक्षीदार सुध्दा मदत करीत नसल्यामुळे त्याची साक्ष नोंदविली नाही. सदरहू प्रकरणात आरोपी कडून झालेली जप्ती स्वतंत्र पंच साक्षीदाराकडून सिध्द होणे महत्वाचे होते. परंतु प्रस्तुत प्रकरणात सदरहू जप्ती सिध्द झालेली नाही. तसेच सि.ए. रिपोर्ट अभिलेखावर दाखल केलेला नाही. त्यामुळे असे निष्कसीत होते की, आरोपीविरुध्द लावण्यात आलेला गुन्हा सिध्द करण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरला. सबब मी **मुद्दा क्र. १ ते २ चे उत्तर नकारार्थी** देत आहे आणि मुद्दा क्रमांक ३ ला अनुसरून खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. आरोपीची महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (ई) च्या गुन्हयातुन फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५ (१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. जप्ती पंचनाम्याप्रमाणे जप्त शिल्लक हातभट्टी दारू राज्य उत्पादन शुल्क, गोंदिया यांच्याकडे अपीलाचा कालावधीनंतर विल्हेवाट लावण्याकरीता पाठविण्यात यावी.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७—अ च्या पुर्ततेसाठी रूपये ७,५००/— (रूपये सात हजार फक्त) चे जामीन द्यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर)

Digitally signed by APEKSHA TULARAM BANSOD
Date: 2026.03.11 17:47:29 +0530

**दिनांक : ११/०३/२०२६**
**स्थळ : तिरोडा**

**(श्रीमती अ.तु.बन्सोड )**
**न्यायदंडाधिकारी, प्रथमश्रेणी तिरोड**